**प्रेस नोट दि.१६/०५/२०२३**

**गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवडची धडाकेबाज कामगिरी**

**सराईत गुन्हेगारास पकडुन त्याचेकडुन एकुण ११ मोटार सायकल जप्त.**

गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड कडिल अधिकारी व अंमलदार हे मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांप्रमाणे व मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्डवरील आरोपी नामे राहुल दगडु शिंदे वय २० वर्ष रा. बि. न १०, रुम नं १०३, श्रीराम सोसायटी ओटास्किम निगडी पुणे याचे मागे सुमारे ६ महिण्या पासुन होते त्यास मोठया शिताफिने पकडुन **सांगवी पोलीस स्टेशन गु. रजि. नं. १६३/२०२३ भा. दं. वि.कलम ३७९** या गुन्हयात अटक करुन त्याची पोलीस कस्टडी रिमांड घेवुन त्याचेकडे अटक मुदतीत कसुन तपास करुन त्याने पिंपरी चिंचवड व पुणे ग्रामीण भागातुन सुमारे १ वर्षापासुन चोरुन आणलेल्या **एकुण किं.रुपये ५,१०,०००/- च्या ११ मोटार सायकली हस्तगत करुन एकुण ०७ गुन्हे उघडसकिस आणले आहेत.**

गुन्हे शाखा, युनिट-४ कडिल वाहनचोरी करणारे अभिलेखारील गुन्हेगार चेक करीत असताना त्यांना खात्रीशिर बातमी मिळाली कि, रेकॉर्डवरील वाहन चोरीचे गुन्हे करणारा इसम नामे **राहुल दगडु शिंदे रा. बि. न १०, रुम नं १०३, श्रीराम सोसायटी ओटास्किम निगडी पुणे** हा बऱ्याच दिवसांपासुन त्याचे मुळ पत्त्यावर राहणेस नसुन त्याने पिंपरी चिंचवड हद्दितील व पुणे जिल्ह्यातील इतर भागांतील मोटार सायकली चोरुन त्याचे ओळखीचे लोकांना विकल्या आहेत, वगैरे बातमी मिळाल्यावरुन त्याचेबाबत इतर गोपनिय बातमिदारांना कळवुन त्याचा शोध घेत होतो, दिनांक ११/०५/२०२३ रोजी सहायक पोलीस निरीक्षक बाबर, पोलीस उप निरीक्षक गणेश रायकर, सपोफौ जाधव, पो.हवा. तुषार शेटे, मोहम्मदगौस रफिक नदाफ पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, सुखदेव गावंडे असे मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो गुन्हे शाखा युनिट ४ पिपंरी चिंचवड यांच्या आदेशान्वये राहुल दगडु शिंदे यास ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन त्याने पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे हद्दितुन तसेच पुणे जिल्ह्याचे इतर भागातुन चोरलेल्या वेगवेगळ्या मोटारसायकल / मोपेड दुचाकी ह्या वेगवेगळ्या इसमांना विकल्याचे केले तपासामध्ये निष्पन्न करुन आरोपी नामे राहुल दगडु शिंदे वय २० वर्ष रा. बि. न १०, रुम नं १०३, श्रीराम सोसायटी ओटास्किम निगडी पुणे याने विकलेल्या ०७, लपवुन ठेवलेल्या ०३ अशा मोटारसायकल / मोपेड जप्त करण्यात आल्या व **रांजणगाव पोलीस स्टेशन येथे भा.दं.वि. कलम ३९५ या गुन्ह्यात जप्त असलेली मोटारसायकल बाबतचा गुन्हा उघडकिस आणण्यात आला.**

सदर गुन्हयातील आरोपी याचेकडुन जप्त करण्यात आलेल्या मोटारसायकल / मोपेड पैकी ०४ मोटारसायकल / मोपेड मालकांबाबत माहिती मिळुन येत नाही, सुमारे ०१ वर्षाच्या कालावधीमध्ये वाहनचोरी झालेल्या नागरीकांनी गुन्हे शाखा, युनिट-४ येथे जप्त ०४ वाहने आपली आहेत अगर कसे याबाबत संपर्क साधावा असे अवाहन करण्यात आले आहे.

---

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री.विनयकुमार चौबे सो, सह पोलीस आयुक्त मा.श्री. डॉ.संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे स्वप्ना गोरे मॅडम, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर, पोलीस उपनिरीक्षक गणेश रायकर, दादा पवार, नारायण जाधव, संजय गवारे, पो.हवा. रोहिदास आडे, तुषार शेटे, मोहम्मदगौस रफिक नदाफ पोना/ वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, सुखदेव गावंडे यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे
पिंपरी चिंचवड